




दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**विकास वॉटरप्रुफिंग**

घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष

विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने लिकेच थांबवली जाते.

संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २२३ वा | शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# ‘टेबल, खुर्च्या विका अन पैसे द्या; नाहीतर 'लाडकी बहीण' बंद करा’

## पैसे नाहीत सांगणाऱ्या फडणवीस सरकारवर उच्च न्यायालयाचे ताशेरे

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शन व अन्य लाभ देण्यासाठी पालिकेकडे पैसे नाहीत. कारण राज्य सरकार पैसे देत नाही, असे सांगणाऱ्या मुंबई महापालिकेच्या वकिलांना मुंबई उच्च न्यायलयाने झाप झाप झापले.

तसेच लाडकी बहीण योजनेसाठी 40 हजार कोटी खर्च करत आहात, मग पैसे कसे नाहीत? असा सवाल विचारत राज्य सरकारलाही चांगलेच फटकारले.

मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागातील एका निवृत्त महिला कर्मचाऱ्याला महापालिकेने सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शन व अन्य लाभ न दिल्याने या कर्मचाऱ्याने उच्च न्यायालयात दाद मागितली आहे. गत सुनावणीत महापालिकेने संबंधित महिला कर्मचाऱ्याला ३० मे २०२६ पर्यंत सहाव्या वेतन आयोगानुसार पेन्शनसह अन्य लाभ देण्याची तयारी दर्शवली होती. पण न्यायालयाने सातव्या



वेतन आयोगानुसार पेन्शनसह अन्य लाभ का देणार नाही, याचे स्पष्टीकरण मागितले होते.

यावर महापालिकेच्या वकिलांनी उपशिक्षणाधिकाऱ्यांचे प्रतिज्ञापत्र सादर केले. या प्रतिज्ञापत्रावर न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. "उद्या कोणत्या तरी शिपायाचे प्रतिज्ञापत्र सादर कराल, मग ते आम्ही स्वीकार करायचे का? आम्हाला आयुक्तांचेच प्रतिज्ञापत्र हवे आहे, आम्ही त्यांनाच सांगू, असे म्हणत न्यायालयाने अतिरिक्त आयुक्तांना याबाबत स्पष्टीकरण देण्यासाठी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले. याच प्रतिज्ञापत्रात सांगितलेल्या कारणावरून न्यायलयाने महापालिका आणि राज्य सरकारवर ताशेरे ओढले.

"सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शनसह अन्य लाभ देण्यासाठी महापालिकेकडे पैसे नाहीत. कारण राज्य सरकारच पैसे देत नाही, असे वकिलांनी न्यायालयाला सांगितले. यावर न्यायालयाने संताप व्यक्त केला. 'लाडकी बहीण' योजनेसाठी ४० हजार कोटी खर्च होत आहेत. मग, पैसे कसे नाहीत? महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांना सातव्या वेतन आयोग लागू आहे, त्यासाठी राज्य सरकारकडून पैसे येतात. फक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी पैसे नाहीत का? असा सवाल केला.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन देण्यास पैसे नसतील तर महापालिका कार्यालयांतील टेबल, खुर्च्या, अउ विका. गरज पडल्यास महापालिका आयुक्तांच्या गाडीसह अन्य गाड्या विका; पण कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे द्या. अन्यथा 'लाडकी बहीण' योजनाच बंद केली पाहिजे, अशा शब्दांत नाराजी व्यक्त केली. यावेळी महापालिकेच्या वकिलांनी राज्य सरकारला या याचिकेत प्रतिवादी करावे, अशी मागणी केली.


**सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!**

श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे

वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.

1299/- प्रति स्क्वे. फूट

मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.

9763764949


## जागृत मारूती देवस्थानत हनुमान जन्मोत्सव उत्साहात

### ४ हजार भाविकांना महाप्रसाद वाटप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शेळगी रोड येथील जागृत मारूती देवस्थानच्या वतीने हनुमान जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. धार्मिक विधी, सामाजिक उपक्रम आणि महाप्रसाद वितरण अशा विविध कार्यक्रमांनी हा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला.

उत्सवाची सुरुवात पहाटे ५ वाजता पारंपरिक पद्धतीने पाळणा सोहळा आणि मारूतीरायांच्या मूतीर्ला अभिषेक करून करण्यात आली. पुराणिक स्वामी यांच्या हस्ते अभिषेक विधी पार पडला.





त्यानंतर दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.


या उत्सवाचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे महाप्रसादाचे आयोजन. सुमारे ४ हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. भाविकांनी मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचा स्वीकार केला. मंदिर परिसरात दिवसभर भक्तांची वर्दळ कायम होती.

धार्मिक कार्यक्रमासोबतच सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिर आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. महात्मा बसवेश्वर ब्लड बँक तसेच आधार हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाने या शिबिरात सेवा दिली. अनेक नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक कर्तव्य पार पाडले, तर शेकडो नागरिकांनी आरोग्य तपासणी करून घेतली. गरजू रुग्णांना मोफत औषधांचेही वितरण करण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देवस्थानचे ट्रस्टी मल्लिकार्जुन शंकरराव तोटद, विरपाक्ष हुणजे तसेच दीपक बोडा, विश्वनाथ बिडवे, सिद्धाराम यलशेट्टी, प्रवीण इरकशेट्टी, निलेश अंकम, रवी मेळ्ळे आदी कार्यकर्ते आणि भाविकांनी परिश्रम घेतले.

भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यंदाचा हनुमान जन्मोत्सव अधिकच भव्य आणि संस्मरणीय ठरल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली.

## उजनी धरणातून एप्रिलअखेर भीमा नदीत पाणी सोडणार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वाढत्या उन्हाच्या तडाख्यामुळे शेती पिकांच्या पाण्याची मागणी वाढली असून, उजनी धरणातील पाणीसाठा वेगाने खाली जात आहे. एप्रिल महिन्याच्या अखेरीस भीमा नदीतून पिण्यासाठी पाणी सोडले जाणार असल्याने, साधारणपणे १० ते १५ मे दरम्यान उजनी धरण उणे पातळीत जाईल, असा अंदाज लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाने वर्तविला आहे. सध्या उजनी धरणात पुरेसा पाणीसाठा असला तरी उन्हाळ्यामुळे बाष्पीभवन आणि उपसा वाढला आहे. धरणात सध्या एकूण पाणीसाठा ८३.५४ टीएमसी आहे, तर त्यापैकी उपयुक्त साठा १९.६७ टीएमसी (३७.६२ टक्के) आहे. सध्या ३९९० क्युसेक इतका पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

जिल्ह्यातील दीड लाख हेक्टर क्षेत्राला उजनीचे पाणी मिळते. सध्या शेतीसाठी डाव्या व उजव्या कालव्यांसह, बोगदा, सीना-माढा आणि दहीगाव उपसा सिंचन योजनांमधून पाणी सुरू आहे.

साधारण शेतीचे हे पाणी ३० मेपर्यंत सुरू राहणार आहे. पण पिण्याच्या पाण्याच्या योजनांचा विचार करता, एप्रिलअखेर भीमा नदीत साडेपाच टीएमसी पाणी सोडले जाईल, असे सांगण्यात आले. विविध योजनांमुळे धरणातील साठा दररोज अर्धा टीएमसीने कमी होत आहे.


**आरोग्यविषयक**

**मुळव्याध आहे?**

ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.

**संपर्क :**

कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर

मो.नंबर 9970115450


## संत शिरोमणी सावता महाराज तीर्थक्षेत्राच्या जमिनीबाबत अन्यायकारक अधिग्रहणाचा आरोप

### शंकर लिंगे यांची तातडीच्या कारवाईची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संत शिरोमणी सावता महाराज तीर्थक्षेत्रासाठी संपादित करण्यात येत असलेल्या जमिनीबाबत अन्यायकारक व बेकायदेशीर कारभार सुरू असल्याचा गंभीर आरोप करत संत सावतामाळी प्रतिष्ठानच्या वतीने जिल्हा प्रशासनाकडे तीव्र निवेदन सादर करण्यात आले आहे. या प्रकरणात तातडीने न्याय्य निर्णय न झाल्यास कायदेशीर व लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष शंकर दत्तू लिंगे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संबंधित जमिनीच्या अधिग्रहण प्रक्रियेत प्रशासनाकडून पारदर्शकता राखली जात नसून, याबाबत वारंवार तक्रारी व निवेदने देऊनही कोणतीही ठोस कारवाई किंवा लेखी उत्तर देण्यात आलेले नाही. त्यामुळे जमिनधारकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

६ एप्रिल २०२६ रोजी नियोजन भवन येथे पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत या विषयावर बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, त्या बैठकीत अनेक अधिकारी व संबंधितांना बोलावण्यात आले असले तरी प्रत्यक्ष जमीनधारकांना कोणतीही सूचना देण्यात आली नाही. हा प्रकार पारदर्शकतेच्या आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना विरोधी असल्याचा आरोप निवेदनात



करण्यात आला आहे.

जमीन अधिग्रहणासाठी देण्यात येणारा मोबदला अत्यंत कमी असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सध्या संबंधित परिसरातील बाजारभाव सुमारे ३००० रुपये प्रति चौरस फूट असताना केवळ ४५० रुपये प्रति चौरस फूट दराने मोबदला देण्याचा प्रयत्न केला जात असल्याने हा स्पष्ट अन्याय असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच १२ ते १५ वर्षांपूर्वीच्या जुनाट दरांवर आधारित मूल्यांकन करण्यात येत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

याशिवाय, संबंधित जमीन ही संत सावतामाळी प्रतिष्ठानच्या नावावर असून ती समाजहितासाठी दान करण्यात आलेली आहे. दानपत्रानुसार जमिनीची किंमत २८ लाखांपेक्षा अधिक असल्याचे नमूद असताना सध्याच्या अधिग्रहण प्रक्रियेत त्या वास्तवाचा विचार केला जात नसल्याने हा अन्याय अधिकच गंभीर ठरत असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर प्रतिष्ठानने प्रशासनाकडे काही महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये सर्व संबंधित जमीनधारकांची तातडीने संयुक्त बैठक बोलावणे, बाजारभावानुसार न्याय्य मोबदला निश्चित करणे, ट्रस्टची जमीन अधिग्रहणातून वगळण्याचा गांभीयार्ने विचार करणे, अधिग्रहण झाल्यास प्रकल्पाची अंमलबजावणी प्रतिष्ठानकडे सोपवणे तसेच प्रत्येक जमीनधारकाच्या प्रतिनिधीला शासकीय समितीत कायमस्वरूपी समाविष्ट करणे या प्रमुख मागण्या आहेत.

दरम्यान, प्रशासनाने या प्रकरणाकडे तातडीने लक्ष देऊन योग्य निर्णय घ्यावा, अन्यथा अन्यायाविरोधात तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे सोलापुरात जमीन अधिग्रहण प्रक्रियेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


**शिनगारे सिटी वासुद रोड**
**अल्टिमेट जिमच्या समोर**
**सांगोला**

प्लॉट देणे आहे

N.A.

3100 sft- 3200 sft

-: संपर्क :-

शिनगारे.जे.एम
8275274353

डी.बी.शिंदे
9579421465



**VNP MOTORS**

Multi Brand Car Sales & Services

सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरुम व वर्कशॉप

OFFER

पेट्रोल कार — SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-

डिजेल कार — SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-

AC OVERHAUL — HATCHBACK RS. 2500/- | SEDAN - 3000/- | SUV - 3500/-

FREE PICK-UP & DROP

CNG — RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center

8000-92-8007

VNP MOTORS Pvt. Ltd.

GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007



## खत कंपन्यांनी युरिया व डीएपी खताचा 100 टक्के संरक्षित साठा ठेवणे बंधनकारक - जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** खरीप हंगाम 2026 साठी सोलापूर जिल्ह्याचा खत संरक्षित साठा 10 हजार 600 मेट्रिक टन इतका करण्यात आलेला आहे. यामध्ये युरिया 9 हजार 350 मेट्रिक टन व डीएपी 1 हजार 250 मेट्रिक टन आहे. तरी खत कंपन्यांनी सोलापूर जिल्ह्याचा खतांचा बफर स्टॉक 100% ठेवावा. या स्टॉकमध्ये कोणत्याही परिस्थितीत कमतरता होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी



दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा सनियंत्रण समिती आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन बोलत होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा परिषदेचे जिल्हा कृषी विकास अधिकारी हरी हावळे, जिल्हा विपणन अधिकारी मनोज वाजपेयी, इफको खत कंपनीचे रवींद्र मोरे, इंडियन पोटॅश कंपनीचे ओंकार रनवरे, नॅशनल फटीर्लायझर कंपनीचे पवनलाल हुकरे, राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलायझर्सचे सागर कांबळे यांच्यासह आणि सर्व संबंधित अधिकारी व खत व बियाणे कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन पुढे म्हणाले की मागील वर्षीच्या खरीप हंगामात खत कंपन्यांनी बफर स्टॉक फक्त 54% (पान 2 वर..)

# मराठा साम्राज्याचा नकाशा वगळल्याने संताप

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याच्या शालेय अभ्यासक्रमात करण्यात आलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर इतिहास विषयातून मराठा साम्राज्याचा नकाशा वगळण्यात आल्याच्या निषेधार्थ अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांना निवेदन देण्यात आले. इतिहासाशी छेडछाड खपवून घेतली जाणार नाही, असा ठाम इशारा देत नकाशा तात्काळ पूर्ववत समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली.

महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी मोरे, हनुमंत कदम, सचिन गंगथडे, वैभव चव्हाण, सुहास निंबाळकर, मालोजी शेंबडे, संतोष जाधव, अमोल पवार, नानासो शिंदे, अमर शिंदे, शुभम ताटे, काका यादव, पांडुरंग शिंदे, श्यामराव साळुंखे, नागेश गायकवाड, प्रभावती गायकवाड, रतन थोरवत, बालाजी शिंदे, शरण साळुंखे, दीपक कोठावळे, दीपक गोरे, सुमित गाजरे, प्रज्वल घाडगे, अनिल उकरंडे आदी पदाधिकाऱ्यांनी प्रांताधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मराठा साम्राज्य हा केवळ इतिहासाचा भाग नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व राष्ट्रीय अस्मितेचा महत्त्वाचा घटक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या स्वराज्याचा विस्तार विद्यार्थ्यांना नकाशाच्या माध्यमातून समजणे आवश्यक आहे. मात्र, काही इयत्तांमधून हा नकाशा वगळल्याने विद्यार्थ्यांच्या इतिहासाच्या आकलनावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

त्यामुळे शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये मराठा साम्राज्याचा नकाशा पूर्ववत व स्पष्ट स्वरूपात समाविष्ट करावा, डिजिटल माध्यमांतून नकाशाची सविस्तर माहिती उपलब्ध करून द्यावी, तसेच तज्ज्ञ समिती स्थापन करून अभ्यासक्रमाचे पुनरावलोकन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा महासंघाच्या वतीने देण्यात आला आहे.

# दक्षिण सोलापूर-अक्कलकोटमध्ये ३८ उपद्रवींवर तडीपार कारवाई



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील ३८ उपद्रवी गुन्हेगारांवर तडीपारची कारवाई करून प्रशासनाने त्यांच्यावर प्रभावी अंकुश आणला आहे. उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी सोलापूर क्र. २ सुमित शिंदे यांनी गेल्या तीन वर्षांत ही कारवाई करत गुन्हेगारी प्रवृत्तीवर वचक बसविला आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांकडून प्राप्त प्रस्तावांवर आधारित ही मोहीम यापुढेही सुरू राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्राप्त माहितीनुसार, महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ५६ अंतर्गत गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर नियंत्रण ठेवण्यासाठी तडीपारची कारवाई केली जाते. त्यानुसार २०२३ मध्ये ८, २०२४ मध्ये १२, २०२५ मध्ये ६ आणि २०२६ मध्ये आतापर्यंत १ अशा एकूण प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आली आहे. तसेच कलम ५७ अंतर्गत पुनरावृत्ती करणाऱ्या गुन्हेगारांवर कडक कारवाई केली जाते. या कलमानुसार २०२४ मध्ये ११ प्रकरणांमध्ये तडीपारची नोंद झाली आहे.

दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यांमध्ये वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने कठोर उपाययोजना राबविण्यात येत आहेत. तडीपार ही त्यातील एक प्रभावी कारवाई असून, याअंतर्गत गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना ठरावीक कालावधीसाठी जिल्हा किंवा परिसरातून बाहेर काढले जाते. त्यामुळे स्थानिक पातळीवर गुन्हेगारीला आळा बसण्यास मदत होते.

या कारवाईमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस व महसूल विभाग समन्वयाने काम करत असल्याचे दिसून येते. आगामी काळातही अशा प्रकारच्या कारवाया अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे प्रांताधिकारी सुमित शिंदे यांनी सांगितले.

# सोलापूर शहरात कायदा व सुव्यवस्थेसाठी मनाई आदेश लागू

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील शांतता आणि कायदा व सुव्यवस्था सुरक्षित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 37(1) (2) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत.

पोलीस आयुक्तालय हद्दीत लागू असलेला हा आदेश 10 एप्रिल 2026 रोजी 00.01 वाजल्यापासून ते 24 एप्रिल 2026 रोजी मध्यरात्री 24.00 वाजेपर्यंत प्रभावी राहील, अशी माहिती पोलीस उपायुक्त (गुन्हे/विशा) डॉ. आश्वनी पाटील यांनी पसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

या आदेशानुसार खालील गोष्टींवर बंदी घालण्यात आली आहे:

- मिरवणुका, सभा, पाच किंवा अधिक व्यक्तींचा जमाव
- शस्त्रे, सोटे, विना परवाना बंदुका, तलवारी, सुरे, भाले, दंडुके, झेंडा लावलेली काठी किंवा इजा करण्यास
- वापरता येणाऱ्या वस्तू
- ज्वालाग्राही व स्फोटक पदार्थ
- दगड, फेकावयाची उपकरणे, प्रतिमा किंवा प्रेतयात्रांचे प्रदर्शन
- सार्वजनिक घोषणा, असभ्य हावभाव, ग्राम्य भाषा
- जाती-धर्माच्या भावना दुखावणारे सोंगे, चिन्हे किंवा साहित्य
- सार्वजनिक टिकाकरण उच्चार गाणी गाणे संगीत वाजवणे

हा आदेश ज्या सरकारी नोकरांना त्यांचे कर्तव्य व अधिकार बजावण्यासाठी उपनिर्दीष्ट वस्तु हाताळाव्या लागतात आणि ज्यांनी सक्षम पोलीस प्राधिकरणाची परवानगी घेतली आहे. अशा व्यक्तींना परवानगीतील अटीस पात्र राहुन सदरचे आदेश लागु पडणार नाहीत.

पोलीस प्रशासनाने शहरातील नागरिकांनी शांतता आणि कायदा-सुव्यवस्थेसाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# सर्वांनी स्वच्छतेचा धर्म अंगीकारावा : कुलगुरू



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संत गाडगेबाबा महाराज यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त त्यांच्या स्वच्छतेच्या विचारांचे स्मरण करून ते जीवनात अंगीकारणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी केले. स्वच्छतेमुळे समाजात आरोग्यदायी व सकारात्मक वातावरण निर्माण होते. त्यामुळे कुटुंब, परिसर तसेच सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहा' अंतर्गत गुरुवारी संत गाडगेबाबा महाराज यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. महानवर बोलत होते. कार्यक्रमानंतर विद्यापीठाच्या अतिथीगृहासमोर वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, समन्वयक डॉ. गौतम कांबळे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी डॉ. महादेव खराडे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

समता सप्ताहाच्या निमित्ताने 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन व कार्य' तसेच 'महात्मा ज्योतिराव फुले : जीवन व कार्य' या विषयांवर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमांमधून सामाजिक समतेचे मूल्य, स्वच्छतेचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रभावीपणे देण्यात आल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

# भीम जयंती निमित्त सोलापूरात विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महापालिका आणि आंतरराष्ट्रीय चित्रकार डॉ. सचिन खरात यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मंगळवार दि. 14 एप्रिल 2026 रोजी सकाळी 8 ते 11 वाजेपर्यंत विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी स्पर्धेत सहभागी होणार आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंम्बासे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ही स्पर्धा दि. १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत किल्ला बाग, सोलापूर येथे आयोजित करण्यात येणार आहे. स्पर्धा दोन गटांमध्ये विभागण्यात आली आहे. गट क्रमांक १ मध्ये इयत्ता ५ वी ते ७ वीतील विद्यार्थी सहभागी होणार असून, गट क्रमांक २ मध्ये इयत्ता ८ वी ते १० वीतील विद्यार्थ्यांचा समावेश राहणार आहे. गट १ साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तीचित्र हा विषय देण्यात आला आहे, तर गट २ साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील कोणताही प्रसंग या विषयावर चित्र काढावे लागणार आहे.स्पर्धेसाठी आवश्यक रंग, पेन्सिल व इतर साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणायचे असून, कागद स्पर्धास्थळी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. स्पर्धेची कालावधी दोन तासांचा असेल. स्पर्धेचा निकाल दि. १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत महापालिका आवारात जाहीर करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी ९०४९१०२०१० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पालिका आयुक्त डॉ. सचिन ओंम्बासे यांनी केले आहे.

या स्पर्धेत दोन्ही गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे 3 , 2 व 1 हजार रुपये रुपये रोख तसेच ट्रॉफी, डॉ. आबेडकर यांच्या जीवन कार्यावरील पुस्तक आणि सहभाग प्रमाणपत्र असे बक्षिसाचे स्वरूप राहणार आहे. सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. चित्रकार डॉ. सचिन खरात यांच्याकडून ही बक्षिसे देण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे विजेत्या स्पर्धकांना चित्रकार डॉ. खरात यांच्या चित्रकला शिबिराचा मोफत लाभ मिळणार आहे. सोलापूर शहरातील महापालिका क्षेत्र अंतर्गत असलेल्या सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळातील सुमारे 3 हजार विद्यार्थ्यांचा या स्पर्धेत सहभाग राहणार आहे.

या स्पर्धेच्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय कीरचे चित्रकार डॉक्टर सचिन खरात हे थेट चित्र रेखाटनाचे प्रात्यक्षिक करणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या चित्रकलेचा अविष्कार प्रत्यक्ष पाहता येणार आहे. ही एक वेगळी पर्वणी ठरणार आहे.

या पत्रकार परिषदेस महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने, आंतरराष्ट्रीय चित्रकार डॉ. सचिन खरात, पर्यवेक्षक सुरेश कासार, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे आदी उपस्थित होते.


## जाहीर प्रसिध्दीकरण क्र/अभिलेख/कावि// २०२५
### मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात


बक्ता सय्यद शेख, वय-५३ वर्षे, धंदा-मजुरी, रा. अण्णाभाऊ साठे नगर, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूद्ध**

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. मुख्याधिकारी मोहोळ नगरपरिषद, मोहोळ ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार बक्तार सय्यद शेख यांचा जन्म ता.०१/०६/१९७२ रोजी अर्जदार यांचे आईच्या पोटी राहते घरी मौजे मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांच्या जन्म दाखल्याची ता.०९/१०/२०२५ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुन १९७२ चे अभिलेखात अर्जदार यांचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला. त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. १७/४/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.२ /४/२०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन मा.तहसिलदार सो, मोहोळ

## कटूसत्य शब्दकोडे

**उभे शब्द :** १) एकवीस दुणे २) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा ५) कोकणातील एक स्ट्राँग नेते ६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत) १०) ग्रॅज्युएट (मराठीत) १२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत) १६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा २५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क ३०) याचे कणीस भाजून खातात ३१) उत्सवाचा दिवस ३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख ४१) वाट, मार्ग (हिंदीत) ४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरुद्धार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु - 223

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | | | 4 | | | 6 | |
| | | 1 | 6 | | | 8 | 9 | |
| | | 9 | 8 | 3 | 1 | 5 | | 7 |
| 4 | 9 | | 1 | 5 | 7 | | | |
| | | | | | | | | |
| | 5 | 3 | | | 4 | | | |
| 9 | 6 | | 4 | 1 | 5 | | | 8 |
| 1 | | | 7 | 6 | 3 | 2 | | |
| 3 | | | | 2 | 8 | | 5 | 1 |


## जाहीर प्रसिध्दीकरण क्र/अभिलेख/कावि// २०२५
### मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात

अब्दुरसमद मो सादिक कुरेशी, वय-३८ वर्षे, धंदा-मजुरी, रा. भानेश्वर मंदीरजवळ, बुधवार पेठ, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूद्ध**

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. मुख्याधिकारी मोहोळ नगरपरिषद, मोहोळ ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार अब्दुरसमद मो सादिक कुरेशी यांचा जन्म ता.२०/०७/१९८७ रोजी अर्जदार यांचे आईच्या पोटी राहते घरी मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांच्या जन्म दाखल्याची ता.०७/१०/२०२५ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुलै १९८७ चे अभिलेखात अर्जदार यांचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला. त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि. १७/४/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. २ /४/ २०२४

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन मा.तहसिलदार सो, मोहोळ

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र/अभिलेख/कावि// २०२५
### मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात

वाहीद रशीद कुरेशी, वय - ४४ वर्षे, धंदा-मजुरी, रा. बुधवार पेठ, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूद्ध**

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. मुख्याधिकारी मोहोळ नगरपरिषद, मोहोळ ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार वाहीद रशीद कुरेशी यांचा जन्म ता.०६/०६/१९८१ रोजी अर्जदार यांचे आईच्या पोटी राहते घरी मौजे मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांच्या जन्म दाखल्याची ता.०७/१०/२०२५ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुन १९८१ चे अभिलेखात अर्जदार यांचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला. त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/ हरकत असल्यास दि.१७/४/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता२/४/२०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन मा.तहसिलदार सो, मोहोळ

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र/अभिलेख/कावि// २०२५
### मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात

अब्दुलरसमद मो सादिक कुरेशी, वय-३८ वर्षे, धंदा-मजुरी, रा. भानेश्वर मंदीरजवळ, बुधवार पेठ, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूद्ध**

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. मुख्याधिकारी मोहोळ नगरपरिषद, मोहोळ ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार याचा मुलगी जिया समद कुरेशी हिचा जन्म ता.२७/१०/२०१२ रोजी अर्जदार यांचे पत्नीच्या पोटी राहते घरी मौजे मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांच्या मुलीच्या जन्म दाखल्याची ता.०७/१०/२०२५ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे आक्टोंबर २०१२ चे अभिलेखात अर्जदार यांच्या मुलीचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला. त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या मुलीच्या जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.१७/४/२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.२/४/२०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन मा.तहसिलदार सो, मोहोळ

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र/अभिलेख/कावि// २०२५
### मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात

इद्रिस अय्युब कुरेशी, वय-३९ वर्षे, धंदा-मजुरी, रा. बुधवार पेठ, भानेश्वर मंदीर, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूद्ध**

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. मुख्याधिकारी मोहोळ नगरपरिषद, मोहोळ ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार इद्रिस अय्युब कुरेशी यांचा जन्म ता.११/११/१९८६ रोजी अर्जदार यांचे आईच्या पोटी राहते घरी मौजे मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांच्या जन्म दाखल्याची ता.०७/१०/२०२५ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे नोंव्हेबर १९८६ चे अभिलेखात अर्जदार यांचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला. त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.१७/४/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.२ /४/ २०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन मा.तहसिलदार सो, मोहोळ

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र/अभिलेख/कावि// २०२५
### मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात

रईस मो. हुसेन कुरेशी, वय - ४७ वर्षे, धंदा-मजुरी, रा. कुरेशी गल्ली, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूद्ध**

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. मुख्याधिकारी मोहोळ नगरपरिषद, मोहोळ ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार रईस मो. हुसेन कुरेशी यांचा जन्म ता.२९/०५/१९७८ रोजी अर्जदार यांचे आईच्या पोटी राहते घरी मौजे मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांच्या जन्म दाखल्याची ता.०७/१०/२०२५ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे मे १९७८ चे अभिलेखात अर्जदार यांचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला. त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि. १७/४/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. २/४/२०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन मा.तहसिलदार सो, मोहोळ

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र/अभिलेख/कावि// २०२५
### मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात

रुक्साना अब्बास शेख, (लग्नापुर्वीचे नांव) रुक्साना सिराज शेख (लग्नानंरतचे नांव ) वय-४६ वर्षे, धंदा-मजुरी, रा. मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूद्ध**

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. मुख्याधिकारी मोहोळ नगरपरिषद, मोहोळ ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार रुक्साना अब्बास शेख ( लग्नापुर्वीचे नांव) रुक्साना सिराज शेख (लग्नानंतरचे नांव) यांचा जन्म ता.२८/०४/१९७९ रोजी अर्जदार यांचे आईच्या पोटी माहेरी घरी मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांच्या जन्म दाखल्याची ता.२१/०३/२०२४ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे एप्रिल १९७९ चे अभिलेखात अर्जदार यांचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला. त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि. १७/४/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. २/४/२०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन मा.तहसिलदार सो, मोहोळ

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र/अभिलेख/कावि// २०२५
### मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात

निहाल बक्तावर शेख, वय-२३ वर्षे, धंदा-मजुरी, रा. अन्नाभाऊ साठे नगर, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूद्ध**

नगरपरिषद मोहोळ, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. मुख्याधिकारी मोहोळ नगरपरिषद, मोहोळ ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार निहाल बक्तावर शेख यांचा जन्म ता.०७/०१/२००२ रोजी अर्जदार यांचे आईच्या पोटी राहते घरी मौजे मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांच्या जन्म दाखल्याची ता.०९/१०/२०२५ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जानेवारी २००२ चे अभिलेखात अर्जदार यांचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला. त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/ हरकत असल्यास दि. १७/४/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. २/४/२०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन मा.तहसिलदार सो, मोहोळ

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र/अभिलेख/कावि// २०२५
### मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात

अफजल अब्बास शेख, वय ५८ वर्षे, धंदा- व्यवसाय, रा. मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूद्ध**

१) मा. तहसिलदार साहेब ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस मा. तहसिलदार साहेब, ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. २) ग्रामपंचायत कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर (अर्जाची नोटीस ग्रामसेवक कुरुल. ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी. } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार अफजल अब्बास शेख यांचा जन्म ता.०१/०६/१९६७ रोजी मौजे मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे राहते घरी अर्जदाराची आई हिचे पोटी झाला आहे. अर्जदार यांनी सामनेवाला नं. २ यांच्याकडे अर्जदाराच्या जन्माची दाखल्याची मागणी केली असता, सामनेवाला नं. २ यांनी सदर कालावधील जन्म - मृत्यु रजिष्टर उपलब्ध नसल्याने सदरचा दाखला सामनेवाला नं. १ यांचे कार्यालयातुन घ्यावे असे तोंडी सांगितले. त्यानंतर अर्जदार याने सदर सामनेवाला नं.१ यांचेकडे अर्जदार यांच्या जन्माची दाखल्याची ता. १०/१०/२०२५ रोजीप्रमाणे मागणी केली असता, सामनेवाला नं. १ यांनी माहे जुन १९६७ सालचे रजिष्टर तपासले परंतू त्यामध्ये अर्जदाराचे जन्माची नोंद नसल्याबाबतचा क्र.२०२५/अभिलेख/कावि/९६७ दि.०४/११/२०२५ रोजी दाखला दिला. त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात मृत्युची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.१७/४/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत सक्षम अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे मृत्यु दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. २ /४/२०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन मा.तहसिलदार सो, मोहोळ



## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

